श्री वसंतराव बंडुजी पाटील ट्रस्ट, सांगली
वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, सांगली
पत्ता: साउथ शिवाजी नगर, इनकम टॅक्स ऑफीस जवळ, सांगली मिरज रोड, सांगली
दूरध्वनी क्र.- ०२३३-२३२३७४६
E-mail : vdpacollege@gmail.com
Website : www.vpamcsangli.edu.in

SHRI. V. B. PATIL TRUST R. No. E-297 SANGLI

# जाहिरात

## सरळसेवा पदभरती प्रक्रिया २०२५

श्री वसंतराव बंडुजी पाटील ट्रस्ट, सांगली संचलित वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, सांगली या महाविद्यालयातील, सहयोगी प्राध्यापक रिक्त ०३ व सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील एकुण ०७ रिक्त पदे भरण्याकरीता अर्हताप्राप्त उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, पदांचा तपशिल, शासनाच्या नियमानुसार संवैधानिक आरक्षण व समांतर आरक्षण आणि अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सुचना इत्यादीची सविस्तर माहिती पुढील खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

२. सामाजिक / समांतर आरक्षण: भरावयाच्या पदांचा सामाजिक / समांतर आरक्षणाबाबत तपशील खालीलप्रमाणे:

२.१) सहयोगी प्राध्यापक (एकुण रिक्त पदे - ०३)

| प्रवर्ग | अ.जा S.C. (१३%) | अ.ज. S.T. (७%) | वि.जा. (अ) VJ-A (३%) | भ.ज. (ब) NT-B (२.५%) | भ.ज. (क) NT-C (३.५%) | भ.ज. (ड) NT-D (२%) | इ.मा.व. (१९%) OBC | वि.मा.प्र. (२%) SBC | सा.व. शै. मा. (१०%) SEBC | आ.दु. घ (१०%) EWS | अराखीव Un-reserved (२८%) | एकुण (१००%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | १ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ३ |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ३ |
| महिला (३०%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| माजीसैनिक (१५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| अंशकालीन(१०%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| प्रकल्पग्रस्त (५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| भुकंपग्रस्त (२%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| खेळाडू (५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| अनाथ (१%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| दिव्यांग(४%) | -- | | | | | | | | | | | |

सरळसेवा पद भरती करावयाची विषयनिहाय पदे- सहयोगी प्राध्यापक (एकुण रिक्त पदे - ०३)

| अ. क्र. | पदनाम | विषय | शासनमान्य मंजूर पद |
|---|---|---|---|
| १ | सहयोगी प्राध्यापक | क्रिया शारीर | ०१ |
| २ | सहयोगी प्राध्यापक | अगदतंत्र | ०१ |
| ३ | सहयोगी प्राध्यापक | द्रव्यगुण | ०१ |

२.२) सहाय्यक प्राध्यापक (एकुण रिक्त पदे - ०७)

| प्रवर्ग | अ.जा S.C. (१३%) | अ.ज. S.T. (७%) | वि.जा. (अ) VJ-A (३%) | भ.ज. (ब) NT-B (२.५%) | भ.ज. (क) NT-C (३.५%) | भ.ज. (ड) NT-D (२%) | इ.मा.व. (१९%) OBC | वि.मा.प्र. (२%) SBC | सा.व. शै. मा. (१०%) SEBC | आ.दु. घ (१०%) EWS | अराखीव Un-reserved (२८%) | एकुण (१००%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | -- | ०१ | ०१ | ०१ | -- | -- | ०२ | -- | ०१ | ०१ | -- | ०७ |
| सर्वसाधारण | -- | ०१ | ०१ | | -- | -- | ०१ | -- | ०१ | ०१ | -- | ०५ |
| महिला (३०%) | -- | -- | ०१ | | -- | -- | ०१ | -- | -- | -- | -- | ०२ |
| माजीसैनिक (१५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| अंशकालीन(१०%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| प्रकल्पग्रस्त (५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| भुकंपग्रस्त (२%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| खेळाडू (५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| अनाथ (१%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| दिव्यांग(४%) | एकूण ०७ पदापैकी १ पद दिंव्याग करीता आरक्षित आहे. | | | | | | | | | | | |

सरळसेवा पद भरती करावयाची विषयनिहाय पदे- सहाय्यक प्राध्यापक (एकुण रिक्त पदे - ०७)

| अ. क्र. | पदनाम | विषय | शासनमान्य मंजूर पद |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक प्राध्यापक | क्रिया शारीर | ०१ |
| २ | सहाय्यक प्राध्यापक | द्रव्यगुण | ०१ |
| ३ | सहाय्यक प्राध्यापक | रोगनिदान | ०१ |
| ४ | सहाय्यक प्राध्यापक | स्वस्थवृत्त | ०१ |
| ५ | सहाय्यक प्राध्यापक | अगदतंत्र | ०१ |
| ६ | सहाय्यक प्राध्यापक | प्रसुतीतंत्र स्त्रीरोग | ०१ |
| ७ | सहाय्यक प्राध्यापक | शालाक्यतंत्र | ०१ |

प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्तता करणाऱ्या उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

३. अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक

| अ. क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज नोंदणी सुरु होण्याचा दिनांक | दिनांक ३०.०५.२०२५ रोजी पासून सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत |
| २ | अर्ज नोंदणी करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १४.०६.२०२५ रोजी पर्यंत संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ३ | मुलाखतीचा दिनांक | पात्र उमेवारांना पत्राने कळविण्यात येईल. |

४. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी -

४.१. विविध मागास प्रवर्ग, महिला, प्राविण्यप्राप्त खेळाडू, अनाथ इत्यादींसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

४.२. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक-महिआ २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४ मे, २०२३ अन्वये विहित कार्यपध्दतीनुसार अराखीव महिलांकरीता आरक्षित पदावरील निवडीसाठी अराखीव

महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे.

४.३. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना संबंधित मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतुदी लागू राहतील.

४.४. महिलांसाठी आरक्षित पदांचा लाभ घ्यावयाचा असल्यास, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून इतर सर्व मागास प्रवगातील महिलांसाठी नॉन- क्रीमीलेअरमध्ये मोडत असल्याबाबतचा स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

४.५. विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती. (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

४.६. अर्ज करताना एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

४.७. समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २५ जानेवारी २०२४ तसेच, तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.८. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकःराआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, सादर करणे आवश्यक राहील.

४.९. शासन शुध्दीपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांकः संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक, दिनांक ०९ मार्च, २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, संबंधित उमेदवार उन्नत व प्रगत व्यक्ती / गटात मोडत नसलची पडताळणी करण्यास अद्ययावत आर्थिक वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. तसेच, शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.१०. सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.११. अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता गुणवत्तेच्या आधारे सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

४.१२. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण अधिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण अधिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

४.१३. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन

SHRI. V. B. PATIL R. No. L-297 SANGLI

वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे. वैध प्रमाणपत्रांचा कालावधी संबंधित शासन आदेशातील तरतुदीनुसार (लागू असेल त्याप्रमाणे) ग्राह्य समजण्यात येईल.

४.१४. सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

४.१५. खेळाडू आरक्षणः-

४.१५.१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून, २०२२ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१५.२. प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

४.१५.३. विहित दिनांकास खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

४.१५.४. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पुर्वीचे सक्षम क्रीडा प्राधिकरणाने निर्गमित केलेले क्रीडा प्रमाणपत्र सादर केले नसल्यास अथवा सदर प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी केलेल्या अर्जाची पोचपावती सादर केली नसल्यास, संबंधित उमेदवाराचा खेळाडूकरीता आरक्षित पदावर विचार करण्यात येणार नाही.

४.१५.५. कागदपत्रे पडताळणी/मुलाखतीच्यावेळी संबंधित संवर्ग / पदाकरीता विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र, प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता उमेदवार पात्र ठरतो, याविषयी सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले विहित दिनांकास वैध असलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारशीकरीता विचार करण्यात येईल.

४.१५.६. एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित सक्षम प्राधिका-याकडे सादर करणे बंधनकारक आहे.

४.१६. दिव्यांग आरक्षणः-

४.१६.१. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

SHRI. V. B. PATIL TRUST R. NO. F 297 SANGLI

४.१६.२. शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्र. आयुसे-०२२१/प्र.क्र. २७/आयु-१, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२१ अन्वये खालील दिव्यांग प्रवर्गातील व्यक्ती / उमेदवार सदर पदाकरीता अर्ज करण्यास पात्र आहेत:-

४.१६.३. पात्र दिव्यांग प्रवर्ग

१. Deaf, Hard of Hearing

२. One Leg, Both Legs, Cerebral Palsy, Leprosy Cured, Dwarfism, Acid Attack Victims

३. Autism Spectrum Disorder(Mild), Specific Learning Disability, Mental Illness

४. Multiple Disabilities involving (a) to (c) above

४.१६.४. दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

४.१६.५. दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग/पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

४.१६.६. संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार / व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

४.१६.७. लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतीलः-

१. दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती.

२. दिव्यांगत्याचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सायी सवलती

४.१६.८. लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

४.१६.९. लक्षणीय दिव्यांगत्व असणा-या उमेदवारांना अर्जामध्ये नमूद केलेला दिव्यांगत्वाचा प्रकार / उप प्रकार बदलणे अनुज्ञेय नाही.

४.१७. अनाथ आरक्षण :-

४.१७.१. अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांकः अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक ६ एप्रिल, २०२३, दिनांक १० मे, २०२३ नुसार शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

४.१७.२. अनाथ आरक्षण धोरण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, पूरकपत्र क्रमांकः अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक १० मे, २०२३ अन्वये एखाद्या भरती प्रक्रियेमध्ये अनाथ आरखणाच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमदेवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाहीत तर त्या भरती प्रक्रियेमध्ये ती पदे अनाथांच्या दुस-या प्रवर्गातील उमदेवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

५. वेतनश्रेणी : ७ व्या वेतन आयोगानुसार निर्धारीत केलेली वेतनश्रेणी

| पद | सहयोगी प्राध्यापक | सहाय्यक प्राध्यापक |
|---|---|---|
| वेतनश्रेणी | Academic level 13A<br>रु.१३१४०० ते रु.२१७१००<br>अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते | Academic level १०<br>रु.५७७०० ते रु.१८२४००<br>अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते |

६. सर्वसाधारण अटी व शर्ती

६.१. भारतीय नागरिकत्व

६.२. वयोमर्यादा

| पदाचे नाव | वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वय अमागास / मागासवर्गीय / आ.दु.घ. | अराखीव | मागासवर्गीय / आ.दु.घ. / अनाथ | प्राविण्यप्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजदिष्ट अधिकारी | | दिव्यांग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अराखीव | मागासवर्गीय / आ.दु.घ. / अनाथ | अराखीव | मागासवर्गीय / आ.दु.घ. / अनाथ | |
| सहयोगी प्राध्यापक | अर्ज नोंदणी करण्याचा अंतिम दिनांक १४.६.२०२५ | १९ | ५० | ५५ | ५० | ५५ | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे | | ५० |
| सहाय्यक प्राध्यापक | | १९ | ४० | ४५ | ४३ | ४५ | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे | | ४५ |

६.२.१ जे उमेदवार शासनाच्या सेवेत असतील अशा उमेदवारांच्या बाबतीत प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक संवर्गाकरीता वयोमर्यादा पाच वर्षांनी शिथिल करण्यात येईल.

६.२.२ मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत यापैकी कोणतेही अधिकत्तम असलेली एकच सवलत देय राहील.

६.३. शैक्षणिक अर्हता आणि अनुभव - (शासन सेवा प्रवेश नियम २०१३, दि.२६.०७.२०१३ नुसार)

| अ. क्र. | पद | शैक्षणिक अर्हता | अनुभव | प्राधान्यशील अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | सहयोगी प्राध्यापक | • ज्याने महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महा.२८) याला जोडलेल्या अनुसूचीतील भाग अ, अ-१, ब किवा क यांमध्ये नमूद केलेली अर्हता किंवा भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अन्वये भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली समतुल्य अर्हता धारण केली असेल आणि मान्यताप्राप्त संस्थेतून प्राप्त केलेली आयुर्वेदाच्या संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी धारण केली असेल,<br>• ज्याच्याकडे इंग्रजी, मराठी, संस्कृत व हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल | ज्याला आयुर्वेदाच्या संबंधित विषयामध्ये पाच वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असेल, त्यापैकी मान्यता प्राप्त संस्थेतून संबंधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून तीन वर्षे अध्यापनाचा अनुभव असला पाहिजे | ज्या उमेदवारांचे मुळ शोध निबंध हे, भारतीय चिकीत्सा केंद्रीय परिषदेने मान्यता दिलेल्या आयुर्वेदातील राष्ट्रीय स्तरावरील जर्नलच्या सूचीमध्ये किंवा ग्रंथामध्ये प्रसिध्द झाले असतील त्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |
| ३ | सहाय्यक प्राध्यापक | • ज्याने महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महा.२८) | -- | -- |

SHRI. V. B. PATIL TRUST R. NO. E 297 SANGLI

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | याला जोडलेल्या अनुसूचीतील भाग अ, अ-१, ब किवा क यांमध्ये नमूद केलेली अर्हता किंवा भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अन्वये भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली समतुल्य अर्हता धारण केली असेल आणि मान्यताप्राप्त संस्थेतून प्राप्त केलेली आयुर्वेदाच्या संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी धारण केली असेल,<br>• ज्याच्याकडे इंग्रजी, मराठी, संस्कृत व हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल | | |

SHRI V. B. PATIL TRUST R. No. L 297 SANGLI

६.४. **शैक्षणिक अर्हता व अनुभवाचा कालावधी गणना करण्याचा दिनांक :**

६.४.१. प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

६.४.२. अनुभवाच्या कालावधीची गणना प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकास करण्यात येईल.

७. **अर्ज करण्याची पध्दत –**

१. संस्थेच्या कार्यालयात शनिवार दि. १४.०६.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सर्व आवश्यकत्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आवेदनपत्र समक्ष अगर पोस्टाने पोहचतील अश्या बेताने पाठवावीत.

८. **निवडप्रकिया –**

८.१. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम) २०२१ नुसार निर्गमित उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शा.निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/ प्र.क्र. ९४/१९/ विशि-१, दि.११.०४.२०२२ मध्ये, नमुद कार्यपध्दतीनुसार पदभरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

८.२. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त अर्जांची संख्या विहित कार्यनियमावलीतील तरतुदींनुसार वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोयीस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीमध्ये नमुद शैक्षणिक अर्हता आणि / अथवा अनुभव यापेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता / अनुभव किंवा अन्य योग्य निकष यांच्या आधारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल.

८.३. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही.

८.४. मुलाखतीमध्ये किमान ४५% व त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांचाच शिफारशीसाठी विचार केला जाईल.

८.५. सेवाभरतीबाबतची संपूर्ण प्रक्रिया प्राध्यापक गट-अ, सहयोगी प्राध्यापक गट-अ व सहायक प्राध्यापक गट-ब महाराष्ट्र आयुर्वेदिक सेवा, पदांचे सेवाप्रवेश नियम २०१३, दि.२६.०७.२०१३ आणि तदनंतर शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार राबविण्यात येईल.

८.६. अंतिम शिफारस यादी तयार करताना समान गुण धारण करणा-या उमेदवाराची क्रमवारी (Ranking) शासनाचे विहित तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

SHRI V. B. PATIL TRUST R. No. E 297 SANGLI

९. आवश्यक कागदपत्रे (मुळ कागदपत्रे व स्वयं साक्षांकीत प्रतीसह)

९.१. अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता)

९.२. वयाचा पुरावा (एस.एस.सी. किंवा नगरपरिषद / नगरपालिका / महानगरपालिका किंवा अन्य शासकीय प्राधिकरणाने दिलेला जन्मदाखला)

९.३. शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा

९.४. सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा

९.५. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा

९.६. अद्ययावत नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र

९.७. पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा

९.८. पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा

९.९. अनाथ आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा

९.१०. खेळाडू आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा

९.११. अराखीव महिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र

९.१२. एस.एस.सी. प्रमाणपत्रातील नावात बदल झाला असल्यास त्याचा पुरावा

९.१३. मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा

९.१४. हिंदी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा

९.१५. इंग्रजी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा

९.१६. संस्कृत भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा

९.१७. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन

९.१८. विहित अनुभव प्रमाणपत्र (उपलब्ध असल्यास)

९.१९. शासन सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार आवश्यक संशोधन व प्रकाशने (दावा असल्यास)

९.२०. राज्य शासकीय कर्मचारी / खेळाडू/ दिव्यांग/ माजी सैनिक / मागासवर्गीय, आ.दु.घ, अनाथ यांच्याकरीता वयोमर्यादेतील सवलतीचा दावा असल्यास सादर करावयाचे प्रमाणपत्र

१०. अर्ज शुल्क :

१०.१. अराखीव - रु. ० /-

१०.२. मागासवर्गीय / आर्थिक दुर्बल घटक / अनाथ - रु. ० /-

११. उमेदवारांसाठी सर्वसाधारण सुचना

११.१. अर्जदार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. अर्जदाराकडे महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र (Domiciled) असणे आवश्यक आहे.

११.२. अर्जदारास मराठी लिहिता, वाचता, बोलता येणे अत्यावश्यक आहे.

११.३. आपण कोणत्या प्रवर्गातील आहोत ते तपासूनच उमेदवारांनी त्या-त्या प्रवर्गात अर्ज भरावा.

११.४. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ च्या अटी व इतर शासन निर्णय वित्त विभाग, संकीर्ण-१०००/ प्र.क्र.७०/सेवा-५, दिनांक ११.०८.२००० नुसार विहित अटी लागू राहतील. याबाबत प्रतिज्ञापत्र मुलाखतीच्या वेळी किंवा प्रत्यक्ष कागदपत्र तसपाणीच्या वेळी असणे अनिवार्य आहे.

११.५. निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही वेळी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी असल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/ नियुक्ती कोणत्याही टप्पयावर रद्द करण्यात येईल.

११.६. शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे कार्यालय प्रमुखामार्फत ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

११.७. शासनाने शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील शासनमान्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासन निर्णय दि.१०.०८.२०१६ व शासन निर्णय दि.२९.०३.२०२५ नुसार लागू करण्यात आलेली नवीन परिभाषित अंशदायी सेवानिवृत्ती योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (स्तर-१) योजना लागू राहील.तसेच, तद्नंतर शासनाने वेळोवेळी शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालय व रुग्णालयाबाबत घेतलेले निर्णयानुसार संबंधित योजना लागू राहतील.

११.८. मुलाखतीच्या वेळी प्रमाणपत्र तपासणी दरम्यान पात्रतेसंदर्भातील सर्व मुळ कागदपत्रे सादर न केल्यास शिफारस / नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.

११.९. सदरील जाहिरात वेबसाईट www.vpamcsangli.edu.in वर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.

११.१०. काही शंका असल्यास वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येणाऱ्या हेल्पलाईन नंबर वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

## १२. सेवाप्रवेशोत्तर शर्ती-

नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता/परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहीलः-

१२.१. हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा

१२.२. शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.), क्रमांकः मातंसं-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१३, शासन पूरकपत्र, क्रमांक मातंसं-२०१२/प्रक्र.२७७/३९, दिनांक ०८ जानेवारी, २०१८ व १६ जुलै, २०२१ अथवा महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने यासंदर्भात वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा. नसल्यास नियुक्तीनंतर २ वर्षात सदर अर्हता प्राप्त न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

१२.३. नियुक्तीसाठी निवड झालेल्या उमेदवाराला महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक अठ्ठावीस) या अन्वये अथवा भारतीय वैद्यकीय केंद्रीय परिषद अधिनियम १९७० (१९७० चा अठ्ठेचाळीस) अन्वये नोंदणी करून घ्यावी लागेल. उक्त अधिनियमान्वये ज्या उमेदवारांनी आपली नोंदणी करुन घेतली आहे ते उमेदवार यास अपवाद राहतील.

१२.४. निवड झालेल्या उमेदवारास खाजगी व्यवसाय करण्यास बंदी असून, त्याऐवजी नियमाप्रमाणे व्यवसायरोध भत्ता देय होईल. तसेच, शासनाने वेळोवेळी घेतलेले निर्णय लागू राहतील.

१२.५. सदर पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराला तो/ती विवाहित आहे किंवा कसे? हे जाहिर करावे लागेल. विवाहित असल्यास, पुरुष उमेदवारांचे बाबतीत त्याला एकापेक्षा जास्त हयात पत्नी आहेत किंवा कसे? आणि महिला उमेदवारांचे बाबतीत तिने पत्नी हयात असलेल्या पुरुषाशी विवाह केला किंवा कसे? याबाबत प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल. नियुक्तीनंतर असे प्रतिज्ञापत्र खोटे असल्याचे आढळल्यास, सेवेतून बडतर्फ करण्यात येईल.

१२.६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक क्रमांक-परिवी-२७१४/प्र.क्र३०२/कार्या.८, दिनांक २२ जून, २०२१ अन्वये विहित कार्यपध्दतीनुसार परिवीक्षा धोरणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

१२.७. संस्थेच्या व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती तसेच जाहिरात अधिकृत समजण्यात यावी.

स्थळ : सांगली
दिनांक :

सही
प्र. प्राचार्य / प्राचार्य
प्र-प्राचार्य,
वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, सांगली.

SHRI. V. B. PATIL TRUST R. No. E-297 SANGLI

सही
जनक संस्था अध्यक्ष / सचिव
चेअरमन,
श्री. वसंतराव बंडूजी पाटील ट्रस्ट, सांगली.

सांगली। कोल्हापूर। पुणे। मुंबई। नाशिक। छत्रपती संभाजीनगर। सोलापूर। नागपूर। सातारा। जळगाव। नांदेड। अकोला। अहिल्यानगर येथून दररोज प्रसिध्द

सकाळ

सांगली, शुक्रवार, ३० मे २०२५

• आर. एन. आय. MAHMAR/2021/80430

Shri Vasantrao Banduji Patil Trust's,

## Vasantdada Patil Ayurvedic Medical College & Institute of Yoga, Sangli

In Front of Income Tax office, South Shivaji Nagar,
Sangli-Miraj Road, Sangli – 416416, Ph. No. 0233- 2323746
Email vdpacollege@gmail.com, Website www.vpamcsangli.edu.in

**WANTED**

Applications are invited in the prescribed format, from the eligible candidates for the following posts.

**Associate Professor**

**In Sharir Kriya, Agadtantra, Dravyaguna**

**Assistant Professor (Lecturer)**

**In Sharir Kriya, Dravyaguna, Rognidan, Swasthvruttha, Agad Tantra, Prasuti Tantra Strirog, Shalakya Tantra**

Requisite Qualification, Experience, Other details and prescribed application format are available on University Website: www.muhs.ac.in & on college website: www.vpamcsangli.edu.in. Last date of application is 14/06/2025

Sd/-
**Mr. Sameer B. Birnale**
Chairman

Sd/-
**Dr. Vishwajeet G. Mehetre**
I/c Principal

BENNETT, COLEMAN & CO. LTD. | Estd. MDCCCXXXVIII | VOL. XIII NO. 126 | KOLHAPUR | FRIDAY, MAY 30, 2025 | PAGES 18 | PRICE ₹5

# THE TIMES OF INDIA

INDIA'S LARGEST ENGLISH NEWSPAPER | To subscribe call 1800 1200 004 or visit subscribe.timesofindia.com

## TIMES APPOINTMENTS

Shri Vasantrao Banduji Patil Trust's,

### Vasantdada Patil Ayurvedic Medical College & Institute of Yoga, Sangli

In Front of Income Tax office, South Shivaji Nagar,
Sangli-Miraj Road, Sangli – 416416, Ph. No. 0233- 2323746
Email vdpacollege@gmail.com, Website www.vpamcsangli.edu.in

**WANTED**

Applications are invited in the prescribed format, from the eligible candidates for the following posts.

**Associate Professor**

**In Sharir Kriya, Agadtantra, Dravyaguna**

**Assistant Professor (Lecturer)**

**In Sharir Kriya, Dravyaguna, Rognidan, Swasthvruttha, Agad Tantra, Prasuti Tantra Strirog, Shalakya Tantra**

Requisite Qualification, Experience, Other details and prescribed application format are available on University Website: www.muhs.ac.in & on college website: www.vpamcsangli.edu.in. Last date of application is 14/06/2025

Sd/-
**Mr. Sameer B. Birnale**
Chairman

Sd/-
**Dr. Vishwajeet G. Mehetre**
I/c Principal

## अर्जाचा नमुना

(.......................... या पदासाठी अर्ज)

प्रति,
माननीय अध्यक्ष/प्रभारी प्राचार्य,
वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज,
साऊथ शिवाजी नगर, इनकम टॅक्स ऑफीससमोर,
सांगली ४१६४१६.

डमेदवाराचा नजिकच्या काळातील फोटो चिटकवून स्वतः साक्षांकित करावा

१. संपर्ण नाव (प्रथम आडनाव) -

२. वडीलांचे/ पतीचे नाव -

३. सध्या राहण्याचा पत्ता -

४. भ्रमणध्वनी क्रमांक -

५. जन्मतारीख - दि. १४/०६/२०२५ रोजी वय-

राष्ट्रियत्व - अधिवास राज्य -

६. उमेदवार विवाहीत/अविवाहीत -

७. (अ) जात - (ब)जात वैधता प्रमाणपत्र - आहे/नाही

८. धर्म -

९. ई-मेल आयडी -

१०. खालील नमुद केलेल्या प्रवर्गापैकी (√) अशी खुण करावी.

| अ.जा **S.C.** | अ.ज. S.T. | वि.जा. (अ) **VJ-A** | भ.ज. (ब) NT-B | भ.ज. (क) NT-C | भ.ज. (ड) NT-D | इ.मा.व. (१९%) | वि.मा.प्र. (२%) | सा.व.शै.मा. (१०%) | आ.दु.घ (१०%) | अराखीव **Un-reserved** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

११. शैक्षणिक अर्हताः- (पदवी व पदव्युत्तर अर्हता)

ज्याने महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महा.२८) याला जोडलेल्या अनुसूचीतील भाग अ, अ-१, ब किंवा क यामध्ये नमूद केलेली अर्हता किंवा भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली समतुल्य अर्हता धारण केली असेल आणि मान्यताप्राप्त संस्थेतून प्राप्त केलेली आयुर्वेदाच्या संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी धारण केली असेल.

ज्याच्याकडे इंग्रजी, मराठी, संस्कृत व हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल

| उतीर्ण केलेली व्यावसायिक परीक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उतीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षाचे मिळालेले गुण (एकूण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१२. पदव्युत्तर अर्हता- जसे पदव्युत्तर/पीएच.डी. पदवी परीक्षा

| उतीर्ण केलेली व्यावसायिक परीक्षा | पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा विषय | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उतीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षाचे मिळालेले गुण (एकूण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

(सांक्षाकित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती)

१३. अनुभव-

| संस्थेचे नाव व पत्ता | हुद्दा | कालावधी | | एकूण वर्ष | सेवा सोडल्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | | |
| | | | | | |

१४. अवगत असणाऱ्या भाषा-

| | मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत |
|---|---|---|---|---|
| बोलणे | | | | |
| लेखन | | | | |

१५. आपणा विरुध्द न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालू आहे काय? (असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा)

१६. अर्जासोबत, जाहिरातीत नमुद केलेल्या खालील छायांकित सत्य प्रती जोडलेल्या आहेत. (जात वैधता प्रमाणपत्र व स्त्री उमेदवारांनी विवाहानंतर नावात बदल झाला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र/ नावात बदल झाल्याचे राजपत्र जोडणे बंधनकारक आहे)

| अ.क्र. | सोबत जोडावयाच्या छायांकित सत्यप्रती | प्रत जोडली आहे/नाही |
|---|---|---|
| १ | अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता) | |
| २ | वयाचा पुरावा (एस.एस.सी. किंवा नगरपरिषद / नगरपालिका / महानगरपालिका किंवा अन्य शासकीय प्राधिकरणाने दिलेला जन्मदाखला) | |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | |
| ४ | सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | |
| ५ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा | |
| ६ | अद्ययावत नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र | |
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा | |

| | | |
|---|---|---|
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा | |
| ९ | अनाथ आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा | |
| १० | खेळाडू आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा | |
| ११ | अराखीव महिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र | |
| १२ | एस.एस.सी. प्रमाणपत्रातील नावात बदल झाला असल्यास त्याचा पुरावा | |
| १३ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | |
| १४ | हिंदी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | |
| १५ | इंग्रजी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | |
| १६ | संस्कृत भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | |
| १७ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | |
| १८ | विहित अनुभव प्रमाणपत्र (उपलब्ध असल्यास) | |
| १९ | सेवेत असलेल्या उमेदवारांसाठी ना हरकत प्रमाणपत्र | |
| २० | शासन सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार आवश्यक संशोधन व प्रकाशने (दावा असल्यास) | |
| २१ | राज्य शासकीय कर्मचारी / खेळाडू/ दिव्यांग/ माजी सैनिक / मागासवर्गीय, आ.दु.घ, अनाथ यांच्याकरीता वयोमर्यादेतील सवलतीचा दावा असल्यास सादर करावयाचे प्रमाणपत्र | |

१७. वर नमुद केलेली सर्व माहिती खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल व या बाबतचे सर्व अधिकार संस्थेचे नियुक्त प्राधिकारी यांचे असतील याची मला जाणीव आहे.

ठिकाणः

दिनांकः (अर्जदाराची स्वाक्षरी व नाव)